एस.सी.सी.क्र. ९१/१९
शासन वि. तय्यबखान
निशानी क्रं.१८

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी द्वारे-
मी शपथेवर निवेदन करतो/करते की,
माझे नांव — रतन संभा नायकोडे
वय — ६० वर्षे, धंदा - शेती
राहणार — भोसगा, ता. लोहारा जि. धाराशिव

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. एस.व्ही. काळे यांच्यामार्फत -</u>**

**१.** दिनांक १६/१०/२०१८ रोजी मी जात असताना पोलिसांनी माझी सही घेतली होती. माझी सही कशाबद्यल घेतली हे मला माहित नाही. माझ्या समक्ष पंचनामा झाला नाही. आता मला सदर पंचनामा दाखविला त्यावर पंच क्रं.२ म्हणून माझी सही असून त्यातील मजकुर मला माहिती नाही. सदर सहीस **निशाणी क्रं. १९** देण्यात येते.

**(साक्षीदार हा सरकारपक्षास पाठबळ देत नसल्याने सरकारी वकीलानी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी दिली.)**

**<u>उलटतपास सरकारपक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. काळे यांच्यामार्फत-</u>**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६/१०/२०१८ रोजी मौजे दस्तापूर शिंवारात भारतबाई चव्हाण या च्या शेताजवळ पोलिसांनी मला व दुसरा पंच सुभाष बिराजदार यांना पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ हे राष्ट्रीय महामार्ग क्रं.६५ असून सदरचा रोड हा पुर्व-पश्चिम असून हैद्राबाद- मुंबई जाणारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्त्याचे काम चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्ता हा २२ फुट रुंदीचा डाबरी रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोडच्या दोन्ही बाजूला ५ फुटाचे कच्ची साईडपट्टी आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळापासून १५० फुट अंतरावर एक विद्युत पोल आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ हे रोडच्या मध्यभागापासून दक्षिणेस ८ फुट अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोड हा रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, नाही की, त्याप्रमाणे पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला व मला वाचून दाखविला, त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी घटनास्थळाचा फोटो काढला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्यास वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस आर आडसुळे यांच्यामार्फत</u> -

**३.** नाकारला.

**फेरतपास नाही.**

**माझे समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत**

KALASKAR SHYAM SHRINIVAS
Digitally signed by KALASKAR SHYAM SHRINIVAS
Date: 2025.04.04 17:40:42 +0530

**( एस. एस. कळसकर )**

दिनांक -०४-०४-२०२५.
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग लोहारा.**